# दर्यापूर पंचायत समितीअंतर्गत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार

- ग्रामपंचायतींच्या निविदा प्रक्रियांमध्ये अनियमितता
- सचिवांकडून विकासकामांचे टेंडर 'मॅनेज'
- पनोरा ग्रामपंचायतीसह अन्य गावांमध्येही सर्रास प्रकार




**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.11 )** – दर्यापूर पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायत विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचे धक्कादायक प्रकार समोर आले आहेत. नजिकच्या पनोरा ग्रामपंचायतीसह इतर अनेक ग्रामपंचायतींमध्ये विकासकामांचे टेंडर सचिवांकडून 'मॅनेज' केल्याची तक्रार दै.महासागर ला प्राप्त झाली आहे. यात कंत्राटदारांशी संगनमत करून टेंडर पूर्वनियोजित पद्धतीने मंजूर केल्याचे सांगण्यात आले आहेत.

ग्रामपंचायतींमधून विविध योजनांच्या अंतर्गत रस्ते डागडुजी, गटारी बांधकाम, पाणीपुरवठा, सोलर लाईट आदी कामांसाठी लाखो रुपयांचे टेंडर काढले जातात. परंतु, अनेक कामे प्रत्यक्षात सुरुही न होता कागदोपत्री पूर्ण दाखवली जात आहेत.

तर काही कामांमध्ये निकृष्ट दर्जाचा साहित्य वापर करून शासनाची फसवणूक केली जात आहे. हे सर्व प्रकार ग्रामपंचायत सचिव व ठराविक ठेकेदारांमधील संगनमतातून घडत आहे.

### पनोरा ग्रामपंचायतीचा आढावा

पनोरा ग्रामपंचायतीत विविध विकासकामे पार पडली, ही प्रक्रिया पूर्णपणे मोकळ्या निविदा न देता, परिचित व पूर्वनियोजित कंत्राटदारालाच देण्यात आल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. यामध्ये सचिव सोळंकेने मोठ्याप्रमाणात भ्रष्टाचार केल्याचे सांगण्यात आले आहे. काही प्रकरणांमध्ये कामाचा दर्जा तपासण्याआधीच संपूर्ण रक्कम देण्यात आल्याचेही उघड झाले आहे, त्यामूळे सोळंकेची विभागीय चौकशी लावून त्यांना निलंबित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### ग्रामविकासाचा विश्वासघात!

टेंडर प्रक्रिया मॅनेज करण्यासाठी काही सचिवांकडून 'खास' ठेकेदारांना सूचना देऊन दुसरे अर्जदारच तयार होऊ दिले जात नाहीत. काही प्रकरणांमध्ये नोटीसाही वेळेवर लावल्या जात नाहीत किंवा जाणीवपूर्वक अपूर्ण माहिती देऊन खुली स्पर्धा टाळली जाते. यामुळे सामान्य व पारदर्शक स्पर्धकांवर अन्याय होत असून लोकशाही मूल्यांचा संपूर्ण अपमान केला जातो.

### लोकायुक्त व एसीबी मार्फत चौकशीची मागणी

या प्रकरणात आता लोकायुक्त कार्यालय व लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून (ष्टक्क) सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. संबंधित सचिवांना तात्काळ निलंबित करून स्वतंत्र यंत्रणेमार्फत टेंडर प्रक्रिया तपासावी, अशी जोरदार मागणी केली जात आहे.

# चांदूर रेल्वे तालुक्यात दोन दिवसांपासून संततधार पाऊस

- पळसखेड मार्गावरील विना कठड्याच्या पुलावर पाणी
- जास्त पाऊस झाल्याने नाला व रस्त्यावरील पाणी झाले एकसमान

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.11 )**– आषाढसरींनी अखेर जोरदार हजेरी लावत शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. चांदूर रेल्वे तालुक्यात संततधार पावसामुळे जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाला आहे. चांदूर रेल्वे तालुक्यात मंगळवारी रात्रभर तसेच बुधवारी दिवसभर सतत पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे बुधवारी (ता. 9) सकाळी 10–30 वाजताच्या दरम्यान चांदूर रेल्वे – पळसखेड मार्गावरील विना कठड्याच्या पुलावर पाणी आले होते. यामुळे काही वेळ वाहतुक सुध्दा बंद झाली होती.

चांदूर रेल्वे तालुक्यात बुधवारी सकाळी 10.48 वाजतापर्यंत 49.1 मी.मी. पावसाची नोंद झाली होती. तर आतापर्यंत जुलै महिण्यात 130 मी.मी. पावसाची नोंद झाली आहे. या मुसळधार पावसाच्या हजेरीने तालुक्यातील नदी–नाले ओसंडून वाहत होते. चांदूर रेल्वे शहरातून पळसखेड कडे जाणाऱ्या मार्गावर पाईप कारखान्याजवळील पुलावर मोठ्या प्रमाणात पाणी होते. नाल्याचे पाणी वाढल्याने पाणी रस्त्यावर आले होते. कठडे नसल्याने यावेळी रस्ता कोणता आणि नाला कोणता हे सुध्दा चालकांना ओळखायला येत नव्हते. बुधवारी सकाळी काही वेळापर्यंत या पुलावरून वाहतुक बंद होती. अनेकांनी पुलावरून वाहने न टाकता माघारी घेतले. तर अनेकांनी जिव धोक्यात घालून या पुलावरून प्रवास केला. या वर्दळीच्या रस्त्यावरील नाल्याच्या पुलाला कठडे नसल्याने 'कठड्याविना पूल अपघातास निमंत्रण' अशी स्थिती झाली आहे. विशेष म्हणजे कठडे नसलेल्या पुलावरून मोठ्या प्रमाणावर वाहतुक सुरू असुन सदर पुल पावसाळ्यात जिवघेना ठरू शकतो. जास्त प्रमाणात पाऊस आल्यास नाला व रस्त्यावरील पाणी एकसमान होत असल्याने पुलाची उंची सुध्दा वाढविण्याची गरज निर्माण झाली आहे. सदर पुलावर आजुबाजुने कुठलेही संरक्षण (कठडे) नसल्याने व पुलावरील पाणी वाढल्यामुळे चालकाचा अंदाज चुकल्याने कार सरळ नाल्यात कोसळल्याची घटना 3 वर्षांपुर्वी घडली. मात्र यानंतरही सदर पुलावर पक्के कठडे टाकण्यात आले नाही. त्यामुळे संबंधित विभागाकडून तातडीने यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. अन्यथा या पुलावर पावसाच्या दिवसांत एखादा अनर्थ घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.



### रेल्वे अंडरब्रीज खाली सुध्दा साचते पाणी

पळसखेड मार्गावर याच पुलाजवळ रेल्वे अंडरब्रीज असुन तेथे सुध्दा पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचते. त्यामुळे पाऊस सुरू असतांना रेल्वे अंडरब्रीज खाली जमा होत असलेल्या पाण्यासाठी प्रशासनाकडून काही उपाययोजना करणे महत्वाचे असुन अन्यथा येथेही अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# मनपा मुख्यालयात स्पिटिंग बिन्सचा शुभारंभ

## सफाई अपनावो, बिमारी भगावो उपक्रम



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.11 )** – केंद्र शासनाच्या सफाई अपनावो, बिमारी भगावो या अभियानांतर्गत, अमरावती महानगरपालिकेच्या मुख्यालयात स्पिटिंग बिन्स बसविण्याचा उपक्रम आज प्रायोगिक तत्वावर राबविण्यात आला. या उपक्रमाचा शुभारंभ अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या हस्ते संपन्न झाला.

स्वच्छता वाढविण्यासाठी आणि सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, जैव–घातक कचरा टाकणे यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी या बिन्सचा उपयोग होणार आहे. श्री. गुरुदेव एजेंसी, अमरावती यांच्या मार्फत प्रोप्रायटर राहुल डहाके यांनी ही बिन्स महानगरपालिकेला भेट स्वरूपात प्रदान केली आहेत.

शुभारंभप्रसंगी अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी स्पिटिंग बिन्सच्या वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकत सांगितले की, ही बिन्स पोर्टेबल, पुन्हा वापरता येणारी, आणि गळती प्रतिरोधक आहेत. यामुळे शहरात स्वच्छतेच्या दृष्टीने महत्त्वाचा बदल घडून येईल.

या बिन्समध्ये सुपर शोषक पॉलिमर तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. हे तंत्रज्ञान द्रव कचऱ्याचे घनीकरण करत सुगंधित वातावरण तयार करते. यामुळे सार्वजनिक ठिकाणी थुंकण्याच्या सवयीवर नियंत्रण ठेवण्यात मदत होणार आहे. या बिन्सची आणखी एक खासियत म्हणजे, हे बिन्स जैवविघटनक्षम असून वापरानंतर 15 दिवसांत विघटन होण्यास सुरूवात होते. तसेच, एकदा द्रव घनरूप झाल्यानंतर पुन्हा द्रव होत नाही, यामुळे सार्वजनिक स्वच्छतेसाठी हे अत्यंत उपयुक्त आहेत. या कार्यक्रमावेळी ज्येष्ठ आरोग्य निरीक्षक बुरे, स्वच्छ भारत अभियान समन्वयक श्वेता बोके, स्वास्थ्य निरीक्षक हडाले, आणि एजेंसीचे राहुल डहाके आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनी यावेळी मनपाच्या स्वच्छता उपक्रमासाठी आपली भूमिका स्पष्ट करत, नागरिकांनी स्वच्छतेसाठी स्वत:हून पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. या उपक्रमामुळे सार्वजनिक आरोग्य सुधारण्यास हातभार लागेल आणि स्वच्छ भारत अभियानाच्या उद्दिष्टांना बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# दारूड्या मुलाची आईला मारहाण

**अमरावती** – दारूड्या मुलाने आईला मारहाण केली. ही घटना मोर्शी ठाण्याच्या हद्दीतील चिंचोली गवळी येथे 10 जुलै रोजी सकाळी घडली. चिंचोली गवळी येथील रहिवासी रमेश सहदेवराव कुमरे (32) याने आईला दारू पिण्याकरिता पैसे मागितले. आईने पैसे नाही आहे, असे म्हटल्यावर रमेशने त्यांना काठीने मारहाण केली. रिपोर्ट देण्याकरिता गेली तर हातपाय तोडून टाकेल, अशी धमकीही त्याने आईला दिली.

# गुन्हेगारीमूळे अमरावती राज्यभरात बदनाम!

## काँग्रेसच्या शिष्टमंडळाची पोलिस आयुक्तांसोबत बैठक



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि. 11 )** – अंबानगरी अमरावती शहराला समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभला असला, तरी गेल्या काही वर्षांत येथे गुन्हेगारीचा आलेख झपाट्याने वाढतो आहे. खून, गुटखा एमडी गांजा तस्करी, अवैध हुक्का पार्लर, परप्रांतीयांची गुंडगिरी आणि विस्कळित वाहतूकामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या गुन्हेगारीमूळे अमरावती शहर राज्यभरात बदनाम झाले आहे. या पार्श्वभूमीवर खासदार बळवंत वानखडे, माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख यांच्यासह काँग्रेसच्या शिष्टमंडळाने नुकतेच नव्याने नियुक्त पोलिस आयुक्त अरविंद चावरिया यांची भेट घेऊन शहरातील कायदा सुव्यवस्थेवर सविस्तर चर्चा केली. चर्चेला पोलीस उपायुक्त शिंदे आणि घुगे, माजी महापौर विलास इंगोले, काँग्रेस शहराध्यक्ष बबलू शेखावर, बाळासाहेब ?भुयार, धीरज हिवसे, जयश्री वानखडे, सुनील जावरे, गजानन राजगुरे, सुशील पडोळे, गजानन जाधव, अब्दुल रफिक, समीर जवंजाळ, वैभव देशमुख, निलेश गुहे यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

अलीकडेच अमरावतीत एका पोलीस अधिकाऱ्याचा दिवसाढवळ्या खून करण्यात आला. या धक्कादायक घटनेने पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे केले आणि सामान्य नागरिकांत असुरक्षिततेची भावना पसरली. शिवाय शहरात एमडी, ड्रग्ज, गांजा यांसारख्या अमली पदार्थांची तस्करी सर्रास सुरू आहे. या व्यसनाच्या विळख्यात अल्पवयीन विद्यार्थी आणि युवक अडकत असून अनेक जण गुन्हेगारीच्या मार्गावर वळत आहेत.

### अवैध हुक्का पार्लर आणि पबचे मायाजाळ

हॉटेल पबच्या नावाखाली सुरू असलेल्या हुक्का पार्लरमध्ये निकोटीनयुक्त सुगंधित तंबाखू खुलेआम उपलब्ध आहे. शिक्षणासाठी बाहेरून आलेल्या तरुण तरुणींना याचा मोठा हव्यास लागतो. एमडीचा अंमल आणि हुक्क्याचा धूर यांच्या संगमाने शहरातल्या युवकांच्या आरोग्यावर आणि आळशीपणामुळे गुन्हेगारी प्रवृत्तींवर गंभीर परिणाम होत आहेत.

### परप्रांतीयांची अनधिकृत गुंडगिरी

शहरात इतर राज्यांतून येऊन कोणीही परवानगी न घेता व्यवसाय थाटल्याचे दिसते. काही टोळ्यांनी तर आपला दबदबा निर्माण करून स्थानिक व्यावसायिकांना वेठीस धरण्याचे प्रकार सुरू केले आहेत. त्यामुळे स्थानिक व्यापारी असुरक्षित वाटत असून, पोलिसांनी कठोर तपासणी आणि नोंदणी मोहिम राबवावी, अशी मागणी शिष्टमंडळाने केली.

### वाहतूक कोंडी आणि सिग्नलवरील भीक्षेकरी

ट्रॅफिक पोलिसांच्या अपुऱ्या मनुष्यबळामुळे मुख्य रस्त्यांवर गोंधळाचे वातावरण असते. सिग्नलवर भीक मागणाऱ्या बालकांचे टोळके वाहनचालकांना त्रास देतात, अपघाताचा धोका वाढवतात. या मुलांच्या पुनर्वसनासाठी समन्वयित योजना आखावी, अशी सूचना बैठकीत मांडण्यात आली. नवसारी चौक परिसरातील गुन्हेगारी वाढल्यामुळे तेथे स्वतंत्र पोलीस चौकी उभारावी, तसेच शहरातील पथदिवे, सीसीटीव्ही जाळे आणि बीट पेट्रोलिंगला बळ द्यावे, अशी ठोस मागणी शिष्टमंडळाने केली. दोन्ही सभागृहांच्या पावसाळी अधिवेशनातही अमरावतीतील या प्रश्नांनी उच्चाटन केले असून, राज्यभरात शहराची प्रतिमा मलीन झाल्याचे सदस्यांनी निदर्शनास आणले.

### पोलिस आयुक्तांचा 'मास्टर प्लॅन'

पोलिस आयुक्त अरविंद चावरिया यांनी सर्व मुद्द्यांवर गांभीर्याने लक्ष देत शहरासाठी युद्धस्तरावरील मास्टर प्लॅन जाहीर केला. अवैध धंद्यांवर संयुक्त छापे, ड्रग नेटवर्क बस्ट मोहीम, रात्रीची नाकाबंदी, ड्रोन पाळत, परिसरवार गुन्हेगारी हॉटस्पॉटचे मॅपिंग अशा उपाययोजना तत्काळ राबवण्यात येणार आहेत. पंधरा दिवसांत कार्ययोजना सादर करून वर्षभरात ठोस परिणाम दिसतील, असे आयुक्तांनी सांगितले.

# आषाढी एकादशीनिमित्त भक्तिमय पालखी सोहळा

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि.11 )** – मोर्शी येथील शांतिनिकेतन इंग्लिश स्कूलमध्ये आषाढी एकादशी निमित्त पारंपरिक पद्धतीने पालखी सोहळा, वारी आणि वारकरी दिंडीचे सुंदर आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विठ्ठल–रुक्मिणीच्या वेषात सजून पंढरपूर वारीची प्रतिकृती साकारली. संपूर्ण शाळा परिसर कांदा मुळा भाजी... या भक्तिरसात न्हालेल्या जयघोषांनी दुमदुमून गेला. कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्याध्यापक अमोल चौधरी यांच्या हस्ते झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना वारीचे धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व सोप्या भाषेत समजावून सांगितले. उपमुख्याध्यापिका प्रीती राऊतकर यांनी आपल्या भाषणातून भारतीय संस्कृतीतील भक्ती परंपरेचे मोल अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी पारंपरिक पोशाख, टाळ–मृदुंग, फड हातात घेऊन उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. वारकरी संप्रदायाचे प्रतीक असलेल्या दिंडीचे शिस्तबद्ध सादरीकरण सर्वांचं लक्ष वेधून घेत होतं. वारीनंतर शाळेच्या आवारात भजन, कीर्तन व हरिपाठाचे आयोजन करण्यात आले. या भक्तिपर्वाची संपूर्ण जबाबदारी भाग्यश्री धाकुळकर, चेतना आरेकर, वैष्णवी गीरी, रुपाली गोफणे व कीर्ती बोहरूपी यांनी यशस्वीपणे पार पाडली. त्यांनी विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण, पोशाख व सादरीकरणात उत्तम समन्वय राखला. कार्यक्रमात पर्यवेक्षिका ज्योती लाडविकर, सर्व शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

# घुईखेड नगरीत अवतरले मिनी पंढरपूर

## आषाढी एकादशीनिमित्त हजारो भाविकांचा भक्तिभावाने सहभाग



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.11 )**– चांदूर रेल्वे तालुक्यातील प्रसिद्ध धार्मिक स्थळ घुईखेड येथील संत बेंडोजी महाराज संजीवनी समाधी येथे रविवारी (ता. 6 जुलै) आषाढी एकादशीनिमित्त पारंपरिक पालखी सोहळा, महाआरती आणि मिरवणूक यांचे आयोजन करण्यात आले. या भक्तिमय सोहळ्यास हजारो



भाविकांनी हजेरी लावून संपूर्ण परिसराला पंढरपूरची अनुभूती दिली.

गेल्या शेकडो वर्षांपासून चालत आलेली ही परंपरा घुईखेडवासीयांच्या श्रद्धेचा आणि एकात्मतेचा प्रतीक ठरली आहे. यानिमित्ताने गावात विशेषत– नवविवाहित मुली आणि बाहेरगावी राहणारे ग्रामस्थ यांचा गावाकडे ओढा दिसून आला. सायंकाळी 5 वाजता संत बेंडोजी महाराजांच्या मंदिरातून पालखीचा नगारे, टाळ–मृदुंगाच्या निनादात उत्साहात प्रस्थान झाला. पालखी नागपूर–औरंगाबाद एक्सप्रेस हायवे मार्गे चंद्रभागा नदीच्या पात्रात पोहोचली, जिथे संस्थानचे विश्वस्त प्रविण आणि राधिका घुईखेडकर, तसेच तळेगाव दशासरचे ठाणेदार किरण औटे यांच्या हस्ते महाआरती पार पडली. या वेळी पीएसआय राहुल वानखेडे, पोलीस अंमलदार पवन आलोने, सचिन गायधने, रमेश दाते आदी अधिकारी उपस्थित होते. आरतीनंतर पालखीची घुईखेड गावात प्रदक्षिणा काढण्यात आली आणि सायंकाळी परत मंदिरात आगमन झाले.

### भक्तिरसात न्हाले भाविक

मार्गात वारकरी संप्रदायातील मंडळींनी टाळ–मृदुंग वाजवत फुगड्या खेळत भक्तिरसात न्हालेली मिरवणूक सादर केली. गावकऱ्यांकडून सर्व भाविकांना फराळ, फळे, चहा व पाण्याचे वाटप करण्यात आले. सायंकाळी 6.30 वाजता तहसीलदार पूजा माटोळे आणि त्यांच्या पतींच्या हस्ते बेंडोजी महाराजांच्या अंतिम आरतीने या भक्तिभावाच्या सोहळ्याची सांगता झाली.या दिवशी विश्वेश्वर गावंडे, प्रथमेश गिरी, किशोर येवले, पांडुरंग भोयर, प्रफुल घड्डीनकर, अभिजीत काकडे, मुकुंद काकडे, गोविंद शेंडे, लखपती मेश्राम, राजू तिवाडे यांच्यासह हजारो ग्रामस्थ व भाविक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ठाणेदार औटे यांच्या नेतृत्वात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# फातिमा कॉन्व्हेंट हायस्कूल येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, ( दि.11 )** – फातिमा कॉन्व्हेंट हायस्कूल, अचलपूर या नामवंत शैक्षणिक संस्थेने यंदाच्या माध्यमिक शालांत परीक्षेत (स्स्ष्ट) 100 टक्के निकाल देत पुन्हा एकदा आपली यशाची परंपरा कायम राखली आहे. शाळेचे एकूण 134 विद्यार्थी परीक्षेला बसले होते, यापैकी 104 विद्यार्थ्यांनी प्रावीण्य श्रेणीत यश मिळवत गुणवत्ता सिद्ध केली आहे. विशेष म्हणजे 41 विद्यार्थ्यांना 90 टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त झाले आहेत.




या उत्तुंग यशाच्या निमित्ताने शाळेच्या सभागृहात एक भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले शाळेत प्रथम क्रमांक मिळवणारी रित रिषी खेतान, जिने 98.60 टक्के गुण मिळवले. तिचा तसेच द्वितीय क्रमांक प्राप्त हंसिका गणेश खापेकर हिचा सत्कार शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर विन्सी डिसोजा यांच्या हस्ते करण्यात आला. त्याचप्रमाणे तृतीय क्रमांक मिळवणारी ऋजुजा संतोष वानखडे हिचा सत्कार प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सिस्टर एरीना पाटील यांनी केला. या सर्व विद्यार्थ्यांना पालकांसह सन्मानित करण्यात आले, ज्यामुळे उपस्थितांच्या चेहऱ्यावर अभिमानाचे भाव झळकले. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय नियमित अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे पाठबळ यांना दिले. प्रत्येक दिवशी थोडा वेळ अभ्यासासाठी देणे आणि शिक्षकांच्या सांगण्यानुसार अभ्यासाची दिशा ठेवणे हेच यशाचे खरे गमक आहे, असे मत काही विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी सिस्टर विन्सी डिसोजा व सिस्टर एरीना पाटील यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले.

महासागर

शनिवार, दि. 12 जुलै 2025

अमरावती

पान 3



# अवघ्या काही तासात मारेकरी अटकेत

## प्रेमसंबंधातून झाला त्या महिलेचा खून



**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर, (दि.11) –** अमरावती ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने प्रेमसंबंधातून तरुणीचा खून करून तिचा मृतदेह नाल्यात फेकणाऱ्या आरोपीला काही तासांतच अटक करून उत्कृष्ट कामगिरी केली आहे. अनिल इंद्रमन जांभेकर (वय 35 रा. गळंकी,ता. अचलपूर)) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्यावर हत्या व हत्येनंतर पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेबाबत मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, शिरजगाव रस्त्यालगत वाघी नाल्यात 10 जुलै रोजी एका अज्ञात महिलेचा मृतदेह आढळून आला होता. तपासादरम्यान मृत महिलेचा 'दुर्गा' आणि अनिल उर्फ गोंड्या जांभेकर यांच्यात प्रेमसंबंध असल्याचे स्पष्ट झाले. 5 जुलैच्या रात्री झालेल्या वादामुळे अनिलने दुर्गाचा गळा दाबून 8 जुलै रोजी खून केला आणि मृतदेह रोजी एका ब्लँकेटमध्ये गुंडाळून बाईकवरून नेऊन नाल्यात फेकून दिला. पोलीसांनी केलेल्या तांत्रिक तपास, घटनास्थळावरील निरीक्षण, मोबाईल लोकेशन व माहितीच्या आधारे काही तासांत आरोपीला अटक करण्यात आली. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून, त्याच्या सांगण्यानुसार, दोघांमध्ये मतभेद निर्माण झाले होते व त्यातूनच दुर्गाचा खून झाला.

या प्रकरणी पोलीस निरीक्षक महेंद्र मांडवे, सहाय्यक निरीक्षक मेहेर खान, शिरजगाव पोलीस ठाण्याचे अधिकारी व अमरावती ग्रामीण गुन्हे शाखेचे वरिष्ठ अधिकारी कैलास देशमुख आणि पोलीस अधीक्षक पंकजकुमार भुजनिया यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरु झाला. पोलीस तपासामध्ये आरोपीविरुद्ध भादंवि कलम 302, 201, 379 (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


ही कारवाई तपास पथक प्रमुख पोलिस निरीक्षक विनोद वानखडे यांच्यासह सहायक निरीक्षक शेख मुबीन, शेख नसीर, शेख फारूक, रामु ठाकरे, गणेश मडगे, पी.ओ.शेख, पवन वानखडे, रमेश मोरे, अक्षय गवई, सुरज मोरे, अर्जुन बुरकुले आदी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली.

# बिच्छन नदीत पाच बालक बुडाले

## तिघांना वाचविले, दोघांचा दुर्दैवी मृत्यू | बुरड घाट परिसरात पसरली शोककळा



भावेश चौरासे



दिपक ब्राम्हणे

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर (दि. 11)–** अचलपूर तालुक्यातील बुरड घाट परिसरात शुक्रवारी दुपारी एक हृदयद्रावक घटना घडली. आंघोळीस गेलेले पाच बालक बिच्छन नदीत बुडाले, त्यापैकी तिघांना वाचविण्यात यश आले, मात्र दोन चिमुकल्यांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमूळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

मृत मुलांची नावे भावेश रवींद्र चौरासे (वय 10) व दीपक सिंह मोतीसिंह ब्राम्हणे (वय 10, दोघेही रा. बुरड घाट, अचलपूर) अशी आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, बुरड घाट येथील पाच मुले दुपारच्या सुमारास नदीत आंघोळीकरिता गेली होती. खोल डोहाजवळ गेले आणि पाण्याची खोली लक्षात न ही मुले बुडाली.


### गुरे चारणारा बनला देवदूत

तेथे गुरे चारणाऱ्या व्यक्तीने तिघा मुलांना सुरक्षित बाहेर काढले; परंतु भावेश व दीपक खोल पाण्यात बुडाला. घटनेची माहिती मिळताच आजूबाजूचे नागरिक तात्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यांनी नदीत उतरून शोध घेऊन दोघांना बाहेर काढले आणि तत्काळ अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती दोघांनाही मृत घोषित केले.

### कुटूंबियांमध्ये आक्रोश आणि विलाप

या दुःखद घटनेने दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. नातेवाईकांचे आक्रोश आणि विलाप हृदय पिळवटून टाकणारा होता. परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत कुटुंबीयांना धीर दिला. सध्या दोन्ही मुलांचे मृतदेह उपजिल्हा रुग्णालयाच्या शवगृहात ठेवण्यात आले असून शवविच्छेदनाची प्रक्रिया सुरू आहे. स्थानिक प्रशासन आणि पोलीस यंत्रणेद्वारे आवश्यक ती कारवाई केली जात आहे. या अपघाती घटनेमुळे बुरड घाट परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून स्थानिक पातळीवर नदीकाठी सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

# तीन ठिकाणी बॉम्ब ठेवल्याचा कॉल करणारा युवक उत्तर प्रदेशचा



## पोलिसांनी उघड केला प्रकार



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.11) –** अमरावती शहरात तीन ठिकाणी बॉम्ब ठेवल्याचे कॉल करून खळबळ उडवणाऱ्या घटनेचा अमरावती पोलिसांनी अवघ्या दोन दिवसांत छडा लावला आहे. या प्रकरणात उत्तर प्रदेशमधील गणेश तिवारी नामक एका 23 वर्षीय युवकाला अटक करण्यात आली आहे.

हा युवक सरोज चौकातील एका मोबाइल दुकानात काम करत होता. गुरुवारी सकाळी 11 वाजता पोलिसांनी त्याला दुकानातून ताब्यात घेतले.

अमरावती पोलिस कंट्रोल रूमला सलग दोन दिवस शहरातील तीन ठिकाणी बॉम्ब असल्याचे कॉल मिळाले होते. या कॉलमुळे प्रशासनात खळबळ माजली होती. विशेष म्हणजे या युवकाने कॉल करताना स्वतःचा आवाजही बदलला होता. पोलिसांनी कॉल ट्रेस करत सदर मोबाईल क्रमांकाचे लोकेशन सरोज चौक परिसरात असल्याचे शोधून काढले.

### सात वर्षांपूर्वी अमरावतीत आला होता युवक

सदर युवक मूळचा उत्तर प्रदेशमधील भदोही जिल्ह्यातील असून तो सात वर्षांपूर्वी अमरावतीत आला. त्याने शहरातील विविध भागांत नातेवाईकांकडे राहून शिक्षण घेतले आणि सध्या मोबाईल दुरुस्तीच्या दुकानात काम करत होता. त्याने पोलिस तपासात कबूल केले की, फक्त गंमत म्हणून आणि लोकांची भीती पाहण्यासाठी त्याने बॉम्बसदृश कॉल केले.

### तीसऱ्या कॉलनंतर झाला अटक

सदर युवकाने सर्वप्रथम बुधवारी रेल्वे स्टेशन, जयस्तंभ चौक आणि इर्विन चौक येथे बॉम्ब ठेवल्याचे सांगत पोलिसांना कॉल केला होता. त्यानंतर गुरुवारीही तिसरा कॉल येताच पोलिसांनी लोकेशन ट्रेस करून सरळ दुकानात जाऊन त्याला अटक केली.

# देशी बनावटीचे पिस्तूल, काडतुससह अटक

## अचलपूरात गुन्हेगारीचा कट उधळला!



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 12) –** अचलपूर शहरात गुन्हेगारीची नांदी ठरू शकणारा कट उधळून लावत स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीणने गुरुवारी रात्री धडक कारवाई करत एका 21 वर्षीय तरुणाच्या मुसक्या आवळल्या. आरोपीकडून देशी बनावटीचे पिस्तूल आणि दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आले आहेत. वैध परवाना नसल्यामुळे त्याच्यावर शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

9 जुलै रोजी पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे हरम नाका, अचलपूर येथे सापळा रचण्यात आला. रात्रीच्या वेळी संशयित हालचाली करणाऱ्या दुर्गेश ज्ञानेश्वर विजेकर (वय 21, रा. अब्बासपुरा, अचलपूर) याला थांबवून पोलिसांनी चौकशी केली. झडतीदरम्यान त्याच्या कमरेत लपवलेले पिस्तूल आणि दोन जिवंत काडतुसे आढळून आली. पोलिसांनी जेव्हा त्याच्याकडे शस्त्र वापरण्याचा अधिकार म्हणजेच परवाना विचारला, तेव्हा त्याच्याकडे कोणतीही अधिकृत कागदपत्रे नव्हती. वरून त्याने उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली. त्यानंतर पोलिसांनी तत्काळ पिस्तूल व काडतुसे जप्त करून सरळ पोलीस ठाण्यात नेले. जप्त करण्यात आलेल्या शस्त्र व काडतुसांची एकूण अंदाजित किंमत 26 हजार रुपये असून, दुर्गेश विजेकर हा यापूर्वीही अवैध दारू विक्रीसह इतर गंभीर गुन्ह्यांमध्ये अडकलेला आहे. त्यामुळे त्याच्याकडे हे शस्त्र कुठून आले? कोणासाठी वापरणार होता? अशा अनेक बाबींचा तपास सुरू आहे. सदर घटनेवर भारतीय शस्त्र अधिनियम 3 व 25 अंतर्गत सरमसपूरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या या कारवाईमुळे अचलपूर परिसरातील गुन्हेगारी प्रवृत्तींच्या मनात धडकी भरली आहे. ही कार्यवाही पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. सहाय्यक निरीक्षक निलेश चावडीकर, सचिन पवार, उपनिरीक्षक शिवचरण मंडघे, युवराज मानमोठे, रविंद्र वर्हाडे, स्वप्नील तंवर, सागर नाठे, शांताराम सोनोने व चालक अनिकेत पाचपोर यांचा या यशस्वी कारवाईत मोलाचा वाटा होता.

# दुकान फोडणारे दोन चोरटे अटकेत!

**अमरावती –** अर्जुन नगरमधील एका ट्रेडिंग दुकानात मध्यरात्री हात साफ करणाऱ्या दोन चोरट्यांना अखेर गाडगे नगर डीबी पथकाने जेरबंद केले आहे. तब्बल 21 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरी गेल्यानंतर पोलिसांनी तात्काळ तपासाला वेग दिला आणि केवळ काही दिवसांत आरोपींना मांडवा झोपडपट्टीतून अटक केली. चोरीची घटना राहुल रोहेडा यांच्या दुकानात 10 जुलैच्या मध्यरात्री घडली होती. तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी अज्ञात चोरांविरोधात गुन्हा दाखल केला. त्यानंतर तपासासाठी सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त माहितीचा आधार घेण्यात आला. गजानन अरुण आत्राम (वय 45, रा. अशोक नगर) व आनंदा लक्ष्मणराव राक्षसकर (वय 47, रा. रमाबाई आंबेडकर नगर) अशी आरोपींची नावे आहेत. गुप्त माहितीवरून पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतले असून, हे दोघे मांडवा झोपडपट्टीत लपून बसले होते. डीबी पथकाने त्यांना पकडून चोरीचा संपूर्ण मुद्देमाल हस्तगत केला. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल वर, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज मानकर, डीबी पथकप्रमुख भारत वानखडे, तसेच जावेद अहमद, राजेश गुरेले, गुलरेज खान, रुपेश हटकर, नंदकिशोर करोची व महेश शर्मा यांच्या संयुक्त प्रयत्नातून ही कारवाई यशस्वी झाली.

# मोर्शीत पुन्हा दुपारीच चाकूचा धाक दाखवून लूट

## फायनान्स कर्मचाऱ्याकडून 30 हजार 800 रुपये हिसकावले

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी (दि. 11) –** मोर्शी तालुक्यात चाकूचा धाक दाखवून लूटमार करण्याच्या घटना थांबण्याचे नाव घेत नाहीत. 11 जुलै रोजी दुपारी 2.30 वाजता, मोर्शी–वरूड रस्त्यावर संकटमोचन हनुमान मंदिराजवळ फायनान्स कंपनीच्या कर्मचाऱ्याकडून 30 हजार 800 रुपयांची रोख रक्कम लुटण्यात आली.


पोलीस सूत्रांनुसार, निखिल जानराव तायडे (वय 29, रा. रोहनखेड) हे हैदराबाद येथील ई–रजिस्ट्रीद्वारा संचालित एका फायनान्स कंपनीत कर्जवसुलीचे काम करत होते. त्यांनी हिवरखेड परिसरातील शेतकऱ्यांकडून कृषी साहित्यासाठी दिलेल्या कर्जाची वसुली करून 30 हजार 800 रुपये जमा केले होते. ही रक्कम ते दुचाकीने मोर्शीतील बँकेत भरायला नेत होते. मात्र वाटेत मायवाडीजवळ संकटमोचन हनुमान मंदिर परिसरात लघुशंकेसाठी थांबले असता, तोंडाला दुपट्टा बांधलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यांच्यावर चाकूचा धाक दाखवत रक्कम हिसकावली आणि तेथून फरार झाले. घटनेनंतर निखिल तायडे यांनी मोर्शी पोलीस स्टेशनमध्ये तात्काळ धाव घेत घटनेची माहिती दिली. त्यावरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून ठाणेदार सुरज बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून, चोरट्यांचा शोध सुरू आहे.

### दहा दिवसांत लूटमारीची तिसरी घटना

सदर घटना ही मोर्शी शहरात दहा ते पंधरा दिवसांत घडलेल्या लूटप्रकरणातील तिसरी घटना आहे. याआधीही भरदिवसा भारतीय स्टेट बँकेत पैसे भरण्यासाठी आलेल्या फायनान्स कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून तब्बल 13 लाख रुपये लुटण्यात आले होते. तसेच, पोलीस असल्याची बतावणी करत एका वयोवृद्ध नागरिकाचा सोन्याचा गोफ व अंगठी लुटल्याची घटनाही नुकतीच घडली होती. मोर्शीत दिवसाढवळ्या लूटमारीच्या घटना वाढत चालल्याने नागरिकांत भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. पोलिसांनी यामध्ये जलद तपास करून आरोपींना लवकरात लवकर अटक करावी, सीसीटीव्ही, वाहतूक नियंत्रण यंत्रणा अधिक मजबूत करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

# विदर्भातील विकासाचा अनुशेष दूर करतांना अमरावती विभागाचा समतोल विकास साधावा

## आ. संजय खोडके यांची विधानपरिषदेतून लक्षवेधी मागणी



**महासागर प्रतिनिधी**
**मुंबई/ अमरावती, (दि.11) –** राज्यातील विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रातील विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी राज्य शासनाने वैधानिक विकास महामंडळाची स्थापना केली आहे. मात्र केंद्र सरकारकडे पाठवण्यात आलेल्या प्रस्तावात 'वैधानिक' हा शब्द वापरण्यात आला नसल्यामुळे संभ्रम निर्माण झाल्याचे विधानपरिषदेचे सदस्य आ. संजय खोडके यांनी सभागृहात स्पष्ट केले.

विधान परिषदेच्या अधिवेशनात बोलताना आ. खोडके यांनी केंद्र सरकारकडे पाठवलेल्या प्रस्तावात एका ठिकाणी 'विकास महामंडळ' आणि दुसऱ्या ठिकाणी 'वैधानिक विकास महामंडळ' असे भिन्न शब्दप्रयोग आढळत असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यामुळे नेमका कोणता प्रस्ताव पाठवण्यात आला आहे, याबाबत सरकारने स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी त्यांनी केली.

### विदर्भाच्या विकासात समतोल हवा

यावेळी त्यांनी अमरावती विभागाबाबत विशेष चिंता व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, विदर्भातील नागपूर विभाग हा अनेक बाबतीत आघाडीवर असून, अमरावती विभाग मात्र सातत्याने दुर्लक्षित राहिला आहे. दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत अमरावती विभाग राज्यातील सर्वात मागे आहे. त्यामुळे विदर्भातील विकासाचा अनुशेष भरून काढताना अमरावती विभागाला प्राधान्य द्यावे, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी सभागृहात मांडली.

### निधीच्या वितरणात असमतोल

विकास महामंडळांना अर्थसंकल्पातून निधी तर दिला जातो, मात्र अनेक वेळा मनुष्यबळाचा अभाव, कामांचे मंजुरीप्रमाणात निधी न मिळणे, वा योजनेच्या अंमलबजावणीत अडचणी येत असल्याने निधीचा वापर योग्य रीतीने होत नाही. त्यामुळे निधी वितरणाच्या सूत्राचे पालन करताना नागपूर आणि अमरावती विभागांमध्ये समतोल राखणे अत्यंत आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले.अमरावती विभागात शेती, ग्रामीण विकास, सिंचन, ऊर्जा, आरोग्य आणि मूलभूत सुविधांच्या क्षेत्रात अधिकाधिक निधी देऊन विकासाची गती वाढवावी, असेही त्यांनी सुचवले.

### राज्यमंत्री जैस्वाल यांचे उत्तर

सभागृहात झालेल्या चर्चेचे उत्तर देताना कृषी राज्यमंत्री ना. आशिष जैस्वाल यांनी स्पष्ट केले की, वैधानिक विकास महामंडळ हा शब्द राज्यघटनेच्या तरतुदींनुसार आहे आणि महामहिम राज्यपालांच्या नियंत्रणाखाली हे प्रस्ताव पाठवले जातात. त्यामुळे केंद्र सरकारकडे पाठवलेल्या प्रस्तावात शब्दांत थोडाफार फरक असू शकतो. मात्र यासंदर्भात सदस्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांची शहानिशा केली जाईल, असे त्यांनी सांगितले. राज्यमंत्री जैस्वाल यांनी पुढे सांगितले की, विदर्भाच्या विकासासाठी नागपूर आणि अमरावती या दोन्ही विभागांचा समतोल राखण्याचा सरकारचा प्रयत्न राहणार आहे. अनुशेष भरून काढण्यासाठी आवश्यक पावले उचलली जातील, असे आश्वासनही त्यांनी दिले.

# मेळघाट अवैध व्यवसायमुक्त करा?

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे



**महासागर प्रतिनिधी**
**धारणी, (दि.11) –** भारतीय जनता पार्टीचे मेळघाट, अमरावती ग्रामीण जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांनी मेळघाटात सुरू असलेल्या अवैध धंद्यांविरोधात त्वरित कारवाईची मागणी केली असून, यासाठी त्यांनी राज्याचे महसूल मंत्री व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदन सादर केले होते.

या निवेदनाची गंभीर दखल घेत मा. बावनकुळे यांच्या पुढाकाराने दिनांक 11 जुलै 2025 रोजी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत मेळघाटातील वाढत्या अवैध क्रियाकलापांविषयी चर्चा करण्यात आली व प्रशासनाला तातडीने कठोर पावले उचलण्याचे निर्देश देण्यात आले.

मेळघाट विधानसभा क्षेत्र हे अतिदुर्गम असून, धारणी व चिखलदरा हे दोन्ही तालुके या क्षेत्रात येतात. येथील बहुतांश जनता आदिवासी असून मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करते. परंतु, सध्या या भागात वरली मटका व अवैध दारूचा व्यापार खुलेआम सुरू असून काही ठिकाणी हे प्रकार स्थानिक अधिकाऱ्यांच्या संगनमताने सुरू असल्याचे आरोप करण्यात आले आहेत. या अवैध व्यवसायांमुळे आदिवासी समाजातील अनेक गरीब नागरिक सट्टयाच्या विळख्यात अडकले असून, त्यांच्या कुटुंबातील मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि भवितव्य धोक्यात आले आहे. अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत आहेत, जे समाजाच्या विकासासाठी अत्यंत धोकादायक बाब आहे.या पार्श्वभूमीवर, प्रभुदास भिलावेकर यांनी निवेदनाच्या माध्यमातून मेळघाटातील कायदा–सुव्यवस्थेचे प्रश्न उचलून धरले. या बैठकीमुळे अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाकडून लवकरच कडक कारवाई होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# जन्म-मृत्यू दाखल्याचे वितरण पुन्हा सुरु करण्याचे आदेश

## जिल्हाधिकाऱ्यांचा स्पष्ट निर्णय

## नागरिकांना मोठा दिलासा



**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर,( दि.11 )** - अमरावती जिल्ह्यात काही महिन्यांपासून थांबलेली जन्म व मृत्यू दाखले देण्याची प्रक्रिया अखेर पुन्हा सुरू होणार असल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांनी सर्व तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांना पत्र पाठवून तत्काळ दाखले वितरित करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे अचलपूरसह संपूर्ण जिल्ह्यातील नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

ही प्रक्रिया स्थगित करण्यामागे एक महत्त्वाचे कारण म्हणजे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी अंजनगाव सुर्जी तहसीलमध्ये काही बांगलादेशी व पाकिस्तानी नागरिकांना फर्जी दाखले मिळाल्याचा आरोप केला होता. यानंतर तत्कालीक जिल्हाधिकाऱ्यांनी तपास समिती नेमून संपूर्ण जिल्ह्यातील दाखल्यांची सखोल चौकशी सुरू केली होती.तपासादरम्यान कोणत्याही विदेशी नागरिकाला फर्जी दाखला देण्यात आल्याचा पुरावा आढळून आला नाही. सर्व तहसीलदारांनी शासनाला आपले अहवाल सादर केले.

तरीही सावधगिरी म्हणून ही प्रक्रिया तात्पुरती थांबवण्यात आली होती. आता या निर्णयामुळे अचलपूर, परतवाडा, अंजनगाव सुर्जी, चिखलदरा, धारणी यासारख्या तालुक्यांतील नागरिकांना थेट लाभ होणार आहे. शासनाकडून प्रक्रिया नियमबद्धपणे आणि पारदर्शकपणे राबवण्याचे स्पष्ट आदेश दिल्यामुळे प्रशासनावरही जबाबदारी वाढली आहे.

### विद्यार्थ्यांना, नागरिकांना अडचणी

या स्थगनामुळे विशेषत: विद्यार्थ्यांना शालेय प्रवेश, शिष्यवृत्ती, आधार कार्ड, पासपोर्टसाठी अडथळे निर्माण झाले होते. मृत्यू प्रमाणपत्राअभावी अनेक कुटुंबांना वारसाहक्क, विमा क्लेम, पेंशन यांसारख्या कामांमध्ये विलंब सहन करावा लागला. महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबईच्या आदेशानुसार 21 फेब्रुवारी 2025 रोजीचा स्थगन आदेश रद्द करण्यात आला आहे. यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाने सर्व तहसील कार्यालयांना दाखले तत्काळ वितरित करण्याचे आदेश दिले आहेत.

### कडक नियमांनुसार तपासणी आवश्यक

दाखले वितरित करताना शासन नियमांचे काटेकोर पालन बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच, दिलेल्या दाखल्यांची तपासणी करून अहवाल तात्काळ जिल्हाधिकारी कार्यालयाला सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जरी प्रक्रिया पुन्हा सुरू झाली असली तरी अनेक ठिकाणी दाखले देण्याची गती संथ असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे तहसील कार्यालयांमधील कामकाज जलदगतीने व्हावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# छताची छपाई अंगावर पडून इसम जखमी





**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,( दि.11 )** - येथील नरेंद्र महादेवराव काकने (वय 45) हे गुरुवारी सकाळी घराच्या बेडरूममध्ये विश्रांती घेत असताना अचानक छताची छपाई कोसळून त्यांच्या अंगावर पडली, त्यामुळे ते गंभीर जखमी झाले. या दुर्घटनेत त्यांच्या डोक्याला दुखापत होऊन चार टाके लागले आहेत.

ही घटना 10 जुलै 2025 रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास घडली. त्या वेळी घरात इतर सदस्य उठून बाहेरच्या खोल्यांमध्ये गेले होते, मात्र नरेंद्र काकने हे रिमझिम सुरू असलेल्या पावसामुळे आराम करत बेडवरच होते. थोड्याच वेळात छतावरील जुनी आणि सैल झालेली छपाई जोरात त्यांच्या अंगावर कोसळली, त्यामुळे त्यांना डोक्याला गंभीर इजा झाली. घटनेनंतर घरच्यांनी त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल केले, जिथे प्राथमिक उपचार करून डोक्याला चार टाके टाकण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे, अशी माहिती डॉक्टरांनी दिली आहे. उल्लेखनीय म्हणजे या घराचे छत सुमारे 20 वर्षे जुने असून त्याची दुरवस्था झाल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे. पावसाळ्यामुळे अशा जुन्या घरांमध्ये अपघात होण्याचा धोका वाढतो आहे.

# खडका-पांढरघाटी डांबरी मार्ग आठ दिवसातच उखडला

## नागरिकांतून संताप, कंत्राटदारांवर कारवाईची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.11 )** - खडका ते पांढरघाटी रस्ता नुकताच नव्याने डांबरीकरण करून तयार करण्यात आला होता. माजी आमदार देवेंद्र भुयार यांच्या शिफारशीनुसार जवळपास 2 कोटी रुपयांच्या निधीतून हा रस्ता मंजूर झाला होता. परंतु, या रस्त्याची दयनीय अवस्था केवळ आठ दिवसांतच उघड झाली असून, संपूर्ण रस्ता ठिकठिकाणी उखडला गेला आहे. यामुळे वाहनधारक व ग्रामस्थांतून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असून, यामध्ये ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांची सटेलोटे भूमिका असल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. दोन कोटींच्या निधीतून तयार झालेला रस्ता काही दिवसांतच खराब होतो, यावरून यामधील भ्रष्टाचार आणि हलगर्जीपणा स्पष्ट दिसून येतो.

### गॅरंटी 3 वर्षांची, मात्र 8 दिवसात सत्यानाश

या रस्त्याची गुणवत्ता तीन वर्षांच्या देखभाल व दुरुस्ती कालावधीत टिकायला हवी होती. परंतु आठवड्याभरातच उखडल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखरेखीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ठेकेदाराने या रस्त्यावर आपली मालमत्ता असल्याप्रमाणे मनमानी केली असून, यावर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांनीही दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट होत आहे.

### रस्ता नव्याने करुन घेवू-अभियंता

खडक्याचे सरपंच राहुल फुले यांनी सांगितले, या रस्त्यावर वाहनचालकांची जीवाची कसरत सुरू असून, त्वरित नव्याने दर्जेदार काम व्हावे, ही आमची मागणी आहे. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता चैतन्य खंडारे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, मी लवकरच प्रत्यक्ष जाऊन पाहणी करणार असून, संबंधित ठेकेदाराकडून हा रस्ता पुन्हा नव्याने करून घेण्यात येईल. सध्या तरी ग्रामस्थ या प्रकरणात जिल्हा प्रशासनाच्या कठोर कारवाईची वाट पाहत असून, दोषींवर कारवाई झाली नाही, तर पुढील तीव्र आंदोलनाचा इशाराही दिला आहे.



### काळ्या मातीवर डांबरीकरण

रस्त्याच्या बांधकामात रुंदीकरण करताना काळी माती टाकून त्यावर थेट डांबरीकरण करण्यात आले. परिणामी पावसात माती खचली आणि डांबर सैल झाल्याने रस्ता उखडू लागला. रस्त्याच्या बाजूने मोठमोठे खड्डे पडले असून, त्यात पाणी साचल्याने वाहनधारकांना अंदाज येत नाही. यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. खडका, जामगाव, बारगाव आणि पांढरघाटी या गावांतील नागरिकांनी ठेकेदारावर कारवाईसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करण्याची मागणी केली आहे. हा जनतेच्या पैशाचा अपमान आहे. जर अशा पद्धतीने निधीचा वापर होणार असेल, तर भविष्यात नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे कोणीही लक्ष देणार नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली.

# कुऱ्हा परिसरात पावसाचा फटका

## शेतांना तलावाचे रुप



**महासागर प्रतिनिधी**

**कुऱ्हा, ( दि.11 )** - कुऱ्हा व आजूबाजूच्या परिसरात मागील चार दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शेतांमध्ये अक्षरश: जलाशयाचे स्वरूप निर्माण झाले आहे. त्यामुळे पिकांची सड होण्याची भीती निर्माण झाली आहे.

रविवारी मध्यरात्रीपासून सुरू झालेला पाऊस बुधवारपर्यंत थांबलेलाच नाही. मुसळधार स्वरूपाचा नसलाही तरी, ही सततची रिपरिप शेतीसाठी धोकादायक ठरत आहे. ज्या पिकांना या टप्प्यावर उभी वाढ आवश्यक आहे, त्या पिकांच्या मुळांभोवती साचलेले पाणी सड आणि बुरशीजन्य रोगांना आमंत्रण देत आहे. यंदा जून महिन्यात पावसाने दडी मारल्याने शेती लांबली होती. मात्र, जुलै महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात पावसाने जोर धरल्याने पेरणी केलेल्या पिकांना त्रास होण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी शेतामध्ये दीड ते दोन फुटांपर्यंत पाणी साचलेले असून, निचरा न झाल्यास उत्पादनावर मोठा परिणाम होऊ शकतो.

या पावसामुळे तुर, सोयाबीन, मका, उडीद आदी पिकांचे नुकसान होण्याची शक्यता असून, शेतकऱ्यांमध्ये चिंता व निराशा पसरली आहे. यावेळी वित्तहानी झाली नसली तरी, पिकांच्या दर्जावर व उत्पादनावर याचा परिणाम होण्याचा शक्यता आहे.



# एसएमएस कंपनीकडून दूषित पाणी नाल्यात सोडले

## नागरिकांच्या आरोग्याशी खेळ | प्रदूषण विभाग जबाबदार : नितीन हटवार यांचा आरोप

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.11 )**- नांदगाव पेठ एमआयडीसी परिसरातील एसएमएस कंपनी पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसात, काल रात्री एसएमएस कंपनीकडून ओव्हरफ्लो झालेले दूषित रासायनिक पाणी थेट नाल्यांमध्ये सोडण्यात आले, अशी गंभीर माहिती समोर आली आहे. या प्रकारामुळे परिसरातील जनावरांचे आणि नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या घटनेवर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत माजी जिल्हा परिषद सदस्य नितीन हटवार यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाला थेट जबाबदार धरत, त्यांच्या कारभारावर सवाल उपस्थित केला आहे. ते म्हणाले, गेल्या दहा वर्षांपासून नांदगाव पेठ परिसरातील सर्व प्रकारची पाणीस्त्रोत विहिरी, विंधन विहिरी, बोरवेल, पिण्याच्या पाण्याच्या विहिरी आणि शेतीसाठीच्या विहिरी, पूर्णत: दूषित झाले आहेत. याला प्रदूषण विभागाची ढिसाळ व निष्क्रीय भूमिका कारणीभूत आहे.



एसएमएस कंपनीच्या विरोधात याआधीही अनेक वेळा तक्रारी करण्यात आल्या असून, स्थानिक आमदार व खासदारांनीही या कंपनीच्या अधिकाऱ्यांना भेट देऊन दूषित पाणी 100 टक्के शुद्ध करून पुन्हा एमआयडीसी परिसरात रिसायकल करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, कंपनीकडून या सूचनांकडे सर्रास दुर्लक्ष करण्यात येत असून, ओव्हरफ्लो पाणी नाल्यात सोडले जात असल्याचे आरोप हटवार यांनी केले.नितीन हटवार पुढे म्हणाले की, एसएमएस कंपनीचे अधिकारी जबाबदारी झटकून निष्काळजीपणाने वागतात. हे प्रकरण गंभीर असून, यामुळे नागरिकांचे आरोग्य आणि शेती दोन्ही धोक्यात आले आहे. यावेळी त्यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी पाटील यांना याची तातडीने दखल घेण्याचा आणि कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला. या प्रकारामुळे परिसरात संतापाचे वातावरण असून, नागरिकांनी देखील कंपनीवर कारवाईची मागणी केली आहे. प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# दोन पदाधिकाऱ्यांनी भाजपच्या राज्य परिषदेवर वर्णी

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपुर ( दि.11 )** - भारतीय जनता पार्टीच्या पक्षांतर्गत रचनेनुसार जेष्ठ पदाधिकाऱ्यांना राज्य परिषदेवर पाठवण्यात आले असून मेळघाट जिल्हा अमरावती ग्रामीण येथील तीन पदाधिकाऱ्यांचा यात समावेश करण्यात आला आहे.

भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष सुधीर रसे , पथ्रोट , जिल्हा कार्यकारणी सदस्य अभय माथने अचलपुर तसेच दर्यापूर येथील पदाधिकारी गोपाल चंदन यांची राज्य परिषदेवर निवड करण्यात आली असून ते 2025 ते 2018 या कालावधी भाजपा राज्य परिषद सदस्य राहतील . हे तीनही पदाधिकारी गेल्या दोन-तीन दशकापासून भारतीय जनता पक्षात एक निष्ठेने कार्य करत असुन त्यांनी पक्ष मजबुतीला व वाढीला नेहमी प्राधान्य दिल्याने त्यांचे कार्य बघून त्यांना परिषदेवर निवड करण्यात आली आहे. त्यांनी





या निवडीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस , प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण , पालकमंत्री चंद्रशेखर बावणकुळे , जिल्हाध्यक्ष मेळघाट प्रभूदास भिलावेकर यांचे आभार मानले असून पक्षाने दिलेल्या जबाबदारीत शंभर टक्के खरे उतरू असा विश्वास व्यक्त केला आहे . त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे .

# यास्मीननगरात घर फोडले

**अमरावती** - नागपुरी गेट ठाण्याच्या हद्दीतील यास्मीननगर येथील रहिवासी एका नागरिकाचे घर फोडून 17 हजारांचा ऐवज लंपास करण्यात आला. ही घटना 10 जुलै रोजी उघडकीस आली. यास्मीननगर येथील रहिवासी सय्यद मोहसीन सय्यद तमीज (40) हे कुटुंबासह अजमेरला गेले होते. या काळात अज्ञात चोरट्याने त्यांचे घर फोडून सोन्या-चांदीचे दागिने व रोख असा 17 हजारांचा ऐवज लांबविला. ही बाब लक्षात आल्यावर सय्यद मोहसीन यांनी नागपुरी गेट ठाण्यात तक्रार दाखल केली.


# श्रावण महिन्यात मांसाहार व दारु टाळावी

## धार्मिक आणि वैज्ञानिक कारणांमुळे गरजेचे

**नितीन दुर्बडे**

**पथ्रोट,( दि.11 )**-श्रावण महिना आला की अनेकजण उपवास, व्रत आणि नियमांचे पालन करू लागतात. त्यातील एक महत्त्वाचा नियम म्हणजे मांसाहार, मद्यपान व सिगारेटपासून दूर राहणे, ज्याला %श्रावण पाळणे% असे म्हटले जाते. या परंपरेमागे केवळ धार्मिक नव्हे, तर अनेक वैज्ञानिक आणि आरोग्यदृष्ट्या महत्त्वाची कारणे आहेत.

श्रावण महिना पावसाळ्यात येतो. या ऋतूमध्ये आर्द्रता खूप वाढते. हवामानातील बदलांमुळे





अन्न सहज दूषित होते. मांसाहारात सहजपणे बॅक्टेरिया व विषाणूंची वाढ होते. त्यामुळे अन्न विषबाधा, जुलाब, उलट्या यांचा धोका वाढतो.पावसाळा हा माशांचा प्रजनन काळ असतो. अनेक राज्यांमध्ये याकाळात मासेमारीवर बंदी घातली जाते. यामागे पर्यावरण संवर्धनाचाही हेतू असतो. याशिवाय, पावसाळ्यात नद्यांत आणि तलावांत पाण्याचे प्रदूषण वाढते, ज्यामुळे मासे रोगट होण्याचा धोका वाढतो. हे मासे खाल्ल्यास मानवांमध्ये संसर्गजन्य रोग पसरण्याची शक्यता असते.

### मांसाहार तामसिक आणि अपाच्य

पावसाळ्यात शरीराची चयापचय क्रिया (मेटाबॉलिझम) मंदावते. त्यामुळे मांसाहारासारखे जड अन्न पचवायला शरीराला जास्त त्रास होतो. यामुळे गॅस, अपचन, आम्लता, जडपणा अशा समस्या उद्भवतात. आयुर्वेदानुसार, या काळात हलका व शाकाहारी आहार घेणे उत्तम मानले जाते.

### शरीरातील पाण्याचा तोल बिघडतो

पावसाळ्यात आर्द्रतेमुळे घाम जास्त येतो आणि शरीरातील पाण्याची कमतरता जाणवते. अशा परिस्थितीत अल्कोहोलमुळे निर्जलीकरण (dehydration) होण्याचा धोका वाढतो. तसेच, दारू शरीरात उष्णता निर्माण करते आणि रक्तदाबात चढ-उतार घडवते. पावसामुळे आधीच रस्ते निसरडे होतात. अशात जर दारू पिलेली असेल, तर अपघाताचा धोका अनेक पटींनी वाढतो. राष्ट्रीय आरोग्य संस्था (NIH) च्या अहवालानुसार, रस्ते अपघातांपैकी 40 टक्के हून अधिक प्रकरणे मद्यधुंद अवस्थेत घडतात. हे धोके कोणत्याही वयोगटातील व्यक्तींना लागू शकतात.

### धार्मिक दृष्टिकोन

श्रावण महिन्यात भगवान शिवाची विशेष पूजा केली जाते. या काळात व्रत, उपवास व संयमाचे पालन केले जाते. मांसाहार व दारू हे तामसिक व अपवित्र समजले जात असल्याने, या महिन्यात यापासून दूर राहून शुद्ध जीवनशैलीचा अवलंब करण्याचे धार्मिक महत्त्व आहे.

# वरुडमध्ये महिलेवर चाकूने सपासप वार

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि. 11 )**- वरुड शहरातील बाजार चौकात एका महिलेवर अज्ञात इसमाने चाकूने सपासप वार करून प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी सायंकाळी घडली. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या महिलेला प्रथम वरुड उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती चिंताजनक असल्यामुळे तिला तत्काळ अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात हलवण्यात आले आहे. जखमी महिलेचे नाव कांता रमेश परतेकी (वय 32, रा. मिरची प्लॉट, वरुड) असे आहे.

कांता परतेकी ही महिला सायंकाळी साडेसहा वाजता शेतातील काम आटपून घरी परतत असताना बाजार चौक परिसरात तोंडावर रुमाल बांधलेल्या अज्ञात इसमाने तिला काहीही न सांगता अचानक चाकूने हल्ला केला. तोंड, पोट आणि शरीरावर सपासप वार करून ती गंभीर जखमी केली. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पळून गेला. या घटनेनंतर काही जागरूक नागरिकांनी तत्काळ मदत करत जखमी कांता परतेकी यांना उपचारासाठी वरुड उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पुढील उपचारासाठी अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात हलवण्यात आले आहे. या घटनेची माहिती मिळताच वरुड पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून, जखमी महिलेचे प्राथमिक बयान नोंदवून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीचा शोध सुरू असून पुढील तपास वरुड पोलीस करीत आहेत.

